20 MAY 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

# 'भारत-पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' यावर आज डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे 'भारत-पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. मंगळवारी (दि. २०) सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे हे व्याख्यान होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. गेल्या ३८ वर्षांपासून सुरू असलेल्या या व्याख्यानमालेत यावर्षी डॉ. देवळाणकर ३५ वे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार



आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर सुरू झालेल्या भारत-पाक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर डॉ. देवळाणकर आपल्या खास शैलीत 'भारत-पाकिस्तान युद्ध आणि सद्य:स्थिती' या विषयावर मांडणी करणार आहेत. गेली तीन दशके शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. देवळाणकर यांचे नाव विचारवंत, अभ्यासू आणि धोरणात्मक निर्णयक्षमता असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये घेतले जाते.

उच्च शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे, धोरण निर्मितीत मोलाची भूमिका बजावणारे, आंतरराष्ट्रीय राजकारणावर सखोल अभ्यास असणारे, जेएनयू (नवी दिल्ली) येथून एम.फिल., पीएच.डी. पदवीप्राप्त डॉ. देवळाणकर यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव, राज्य प्रशासकीय सेवा संस्थेचे संचालक, गव्हर्न्मेंट लॉ कॉलेज मुंबईचे प्राचार्य, मनुष्यबळ विकास विभागातील विशेष कर्तव्य अधिकारी, राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक, डॉ. होमी भाभा विद्यापीठात संशोधन व नवोन्मेष विभागाचे संचालक अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ पदवी प्रथम वर्ष प्रवेश सोमवारपासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशाला सोमवारपासून प्रारंभ झाला आहे. काही महाविद्यालयांची ऑनलाईन तर काहीची ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया आहे. शहरातील अनेक महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

विद्यापीठ कार्यक्षेत्र २९९ महाविद्यालये असून पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी, बीबीए, बीसीएला, बीकॉम कॉम्प्युटर ॲप्लीकेशन अशा अनेक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने पारंपरिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत दरवर्षी घट होत असल्याचे चित्र आहे. प्रत्येक महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क वेगवेगळे आहे. दरम्यान, शिवाजी विद्यापीठ अंतर्गत स्वायत्त महाविद्यालयांची स्वतंत्र प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांचा अभ्यासक्रमही स्वतंत्र असल्याने या अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्कही वेगवेगळे असणार आहे.